ePaper

## हाय व्होल्टेज निवडणूकीत बारामतीकरांचा कौल लेकीला की सुनेला?



|| वर्ष - 7 | अंक - 333 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- गोलंदाजीतील विलंब पडणार महागात!
- क्रिती खरबंदाच्या व्हिडीओची चर्चा
- केजरीवालांना आत्मसमर्पण करावं लागणार!


www.mahaenews.com | रविवार, दिनांक 2 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मतदानोत्तर चाचण्यांमध्ये नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधानपदी



# मोदींची हॅटट्रिक!

### » उत्तर ते दक्षिण भाजपचा झेंडा; इंडिया आघाडीचे दावे फोल

| नवी दिल्ली | महाईन्यूज

देशात पुन्हा एकदा मोदी सरकार येणार असा अंदाज मतदान झाल्यानंतर जाहीर झालेल्या विविध एक्झिट पोलच्या मधून व्यक्त करण्यात आला आहे. देशात तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार येणार असल्याचे अनेक एक्झिट पोलमधून अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्याच बरोबर इंडिया आघाडीचे सर्व दावे एक्झिट पोलनी फोल ठरवले आहेत. अधिक तर राज्यांत भाजपची कामगिरी दमदार झाल्याचे म्हटले आहे. काही एक्झिट पोलनी भाजपला ३५० हून अधिक जागा मिळणार असल्याचे म्हटले आहे. भाजपला सर्वाधिक फायदा दक्षिण भारतात झाल्याचे दिसत आहे. केरळपासून तेलंगणापर्यंत भाजपच्या जागा वाढल्याचे एक्झिट पोलमध्ये म्हटले आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजपला तृणमूल काँग्रेस पेक्षा अधिक जागा मिळत असल्याचा अंदाज आहे. राजधानी नवी दिल्लीत भाजपने क्लीन स्विप केल्याचा अंदाज आहे.

> “पूर्ण आत्मविश्वासाने मी सांगतो की मतदारांनी विक्रमी संख्येने राष्ट्रीय लोकशाही आघाडीची पाठराखण केली आहे. विरोधकांना जनतेने पूर्णपणे नाकारले आहे. केवळ मोदी द्वेषावर त्यांचा प्रचार आधारित होता. ज्यांनी रालोआला मतदान केले त्यांचे मनापासून आभार.
>
> – नरेंद्र मोदी, पंतप्रधान

### टाइम्स नाऊ नवभारत ईटीजी

या एक्झिट पोलनुसार देशात पुन्हा एकदा मोदी सरकार येणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या सर्व्हेनुसार एनडीएला ३५८ जागा, इंडिया आघाडीला १३२ जागा तर अन्य पक्षांना ५३ जागा मिळतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

### एबीपी- सी व्होटर

या एक्झिट पोलनुसार भाजप तिसऱ्यांदा देशात सत्ता स्थापन करेल. एनडीएला ३५३ ते ३८३ जागा, इंडिया आघाडीला १५२-१८२ जागा तर अन्यला ४ ते १२ जागा मिळण्याची शक्यता आहे.

### एक्सिस माय इंडिया

आजतक-एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलनुसार भाजप आघाडीला ४०० पेक्षा अधिक जागा मिळू शकतील. या सर्व्हेनुसार भाजप ३६१ ते ४०१ जागा मिळण्याचा अंदाज आहे. इंडिया आघाडीला १३१ ते १६६ जागा मिळतील असे म्हटले आहे.

**MATRIZE**नुसार देशात एनडीएला ३५३ ते ३६८ जागा मिळतील. तर इंडिया आघाडीला ११८ ते १३३ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. अन्य पक्षांना ४३ ते ४८ जागा मिळतील असा अंदाज MATRIZEने वर्तवला आहे.

**PMARQ** च्या एक्झिट पोलनुसार देशात एनडीएला ३५९ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर इंडिया आघाडीला १५४ जागा मिळतील. अन्यला ३ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**जनन की बात**च्या एक्झिट पोलनुसार भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीला ३७७, इंडिया आघाडीला १५१ तर अन्यला १५ जागा मिळण्याची शक्यता आहे.

**D-DYNAMICS**च्या एक्झिट पोलनुसार NDA आघाडीला देशात ३७१ तर इंडिया आघाडीला १२५ जागा मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर अन्य पक्षांना ४७ जागा मिळतील असे म्हटले आहे.

### उत्तर प्रदेशमध्ये भाजपचा दबदबा

उत्तर प्रदेशातील ८० जागांपैकी रालोआ किमान ६० जागा जिंकेल असा अंदाज व्यक्त होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या लोकप्रियतेच्या जोरावर राज्यातील भाजपची पकड मजबूत असल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे.

### दक्षिणेत मुसंडी

गेल्या निवडणुकीत दक्षिणेत भाजपला केवळ २९ जागा जिंकता आल्या होत्या. तुलनेत मतदानोत्तर चाचण्यांमध्ये २०२४ मध्ये भाजप कर्नाटकमध्ये गेल्या वेळच्या २५ जागांच्या तुलनेत तीन ते चार जागा गमावेल असे भाकित वर्तवण्यात आले आहे.

### भाजप आघाडी 350 पार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी साडेतीनशेहून अधिक जागांवर विजय मिळवून तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करेल, असा अंदाज सर्वच मतदानोत्तर चाचण्यांमधून व्यक्त करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी साडेतीनशेहून अधिक जागांवर विजय मिळवून तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करेल, असा अंदाज सर्वच मतदानोत्तर चाचण्यांमधून व्यक्त करण्यात आला आहे. सलग दहा वर्षे सत्तेत राहूनही भाजपविरोधी वातावरण नसल्याचा आणि विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीचा फारसा प्रभाव निकालांवर पडणार नसल्याचा अंदाज या चाचण्यांतून व्यक्त झाला आहे. नरेंद्र मोदी यांनीही या अंदाजांवर प्रतिक्रिया देताना 'संधीसाधू' आघाडी जनतेशी नाळ जोडण्यात अपयशी ठरली, असे म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यातील मतदान शनिवारी सायंकाळी पार पडल्यानंतर उघड झालेल्या सर्व संस्थांच्या मतदानोत्तर चाचण्यांनी रालोआला सरासरी ३५०हून अधिक जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. विरोधी पक्षांची इंडिया आघाडी १२५ ते १५० पर्यंतचा आकडा गाठेल, असे या चाचण्यांत म्हटले आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत सरासरी १३ मतदानोत्तर चाचण्यांनी रालोआला ३०६ आणि काँग्रेसप्रणित संपुआला १२० जागांचा अंदाज व्यक्त केला होता.

# संपूर्ण कुटुंब तुरुंगात!

## अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अग्रवाल अटकेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील कल्याणीनगर येथील हिट अँड रन केसप्रकरणातील मोठी घडामोड समोर आली आहे. या अपघातास जबाबदार ठरलेल्या अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अग्रवाल हिला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. ब्लड सॅम्पल बदलल्याप्रकरणी शिवानी अग्रवाल हिला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.**





पुण्यातील कल्याणीनगर येथील हिट अँड रन केसप्रकरणातील मोठी घडामोड समोर आली आहे. या अपघातास जबाबदार ठरलेल्या अल्पवयीन आरोपीची आई आता पोलिसांच्या ताब्यात आहे. अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अग्रवाल हिला पोलिसांनी अटक केली आहे. ब्लड सॅम्पल बदलल्याप्रकरणी शिवानी अग्रवाल हिला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. क्राईम ब्रांचच्या अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे. यामुळे अग्रवाल कुटुंबाभोवतीचा फास आवळला जात आहे.

### संपूर्ण कुटुंब तुरुंगात

१९ मेच्या मध्यरात्री विशाल अग्रवाल यांच्या अल्पवयीन मुलाने दारू पिऊन भरधाव वेगाने कार चालवत कल्याणीनगर येथए एका बाईकला धडक दिली. त्यामध्ये दोघांचा मृत्यू झाला. या अपघातानंतर पोलिसांनी त्याला अटक केली, मात्र त्याला अवघ्या काही तासांतच जामीन मिळाला. तसेच पोलिसस स्टेशनमध्येही त्याला स्पेशल ट्रीटमेंट मिळाल्याचा आरोप झाला.

त्यामुळे नागरिक संतापले, समाजमाध्यमांमध्ये आणि समाजातही मोठ्या प्रमाणावर रोष व्यक्त झाला.

### बुडत्याचा पाय खोलात...

अग्रवाल कुटुंबाविरोधात आणखी एक तक्रारदार पुढे, काय आहे प्रकरण ?

त्यानंतर याप्रकरणाची खोलात जाऊन चौकशी करताना पुणे पोलिसांनी त्याच्या वडिलांना आणि आजोबांना अटक केली होती. त्यापाठोपाठ आता आज या मुलाच्या आईला अटक करण्यात आली आहे. शिवानी अग्रवाल असं त्यांचं नाव आहे. अल्पवयीन आरोपी, त्याचे वडील विशाल अग्रवाल आणि आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांना आधीच कोठडीत आहेत. तर आता त्याची आईदेखील पोलिसांच्या ताब्यात असून तिची कसून चौकशी करण्यात येणार आहे.

### ब्लड सॅम्पल बदलल्याचा आरोप

याप्रकरणी अटक केल्यानंतर अल्पवयीन मुलाचे रक्ताच नमुने तपासणीसाठी ससूनमध्ये देण्यात आले. मात्र तेथे त्याच ब्लड सॅम्पल बदलण्यात आल्याचा आरोप झाला आला. त्याप्रकरणी ससूनमधील दोन डॉक्टरांना, डॉ. अजय तावरे आणि श्रीहरी हळनोर यांना अटक करण्यात आली होती. त्यांनी पैसे घेऊन आरोपीच्या रक्त्याचे नमुने बदलल्याचे आरोप पोलिसांनी केला. याप्रकरणाची चौकशीसाठी समिती नेमण्यात आली होती. त्यानंतर या दोघांनीच ब्लड सॅम्पलमध्ये फेरफार केल्याचे समोर आले.

आरोपीचं रक्त बदलून एका महिलेचे रक्त देण्यात आल्याची चर्चा आहे. आता याप्रकरणी पोलिसांनी शिवानी अग्रवाल हिला अटक करण्यात आली आहे. अल्पवयीन मुलाच्या रक्ताच्या बदल्यात जे रक्त दिलं गेलं ते शिवानी अग्रवाल यांचं होतं का? त्यांनी कुणाला फोन करुन मुलाला वाचवण्यासाठी मदत मागितली, अपघाताचा ब्लेम कोणाला डोक्यावर घेण्यास सांगितलं, असे सगळे प्रश्न त्यांना चौकशीदरम्यान विचारण्यात येऊ शकतात.

अल्पवयीन मुलाच्या ब्लड सॅम्पलमध्ये फेरफार झाल्याचं उघड झाल्यावर शिवानी अग्रवाल काही काळ बेपत्ता झाल्या होत्या, मात्र अखेर आज पुणे पोलिसांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना ताब्यात घेतलं. दरम्यान आज सकाळी 11.30 वाजता शिवानी अग्रवालच्या समोर पुणे पोलिस अल्पवयीन आरोपीची चौकशी करणार आहेत.

# मुख्याधिकाऱ्यांनी रस्त्यावरील दोन मोटारींना ठोकरले

## मद्यपान केल्याची शक्यता; रक्ताचे नमुने तपासणीसाठी मुख्याधिकारी ताब्यात

।तळेगाव दाभाडे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळेगाव दाभाडे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी एन. के. पाटील यांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या दोन मोटारींना ठोकर दिली. ही घटना शनिवारी (१ जून ) सायंकाळी पाचच्या सुमारास शांताई सिटी सेंटरसमोर घडली. दरम्यान, मुख्याधिका-यांनी मद्यपान केल्याचा आरोप असून त्यांना रक्ताचे नमुने तपासण्यासाठी ताब्यात घेण्यात आले आहे.**







याबाबत सिद्धराम इरप्पा लोणीकर ( वय ३७, रा. नढेनगर, काळेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार मुख्याधिकारी पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलीस निरीक्षक प्रदीप रायन्नावर यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणीकर हे तळेगाव दाभाडे येथील कोटक बँकेत काही कामासाठी आले होते. त्यांनी त्यांची वोल्वो कार रस्त्याच्या कडेला उभी केली होती. स्टेशन चौकाकडून मुख्याधिकारी पाटील हे खासगी स्कॉर्पिओ मोटारीने भरधाव वेगाने आले. त्यांनी पाठीमागून वोल्वो कारला धडक दिली. वोल्वोच्या समोर उभी असलेल्या ब्रेझा मोटारीलाही टोकर बसली. यात दोन्ही मोटारींचे नुकसान झाले आहे. त्यावेळी मोटारीत कोणीही नव्हते. पाटील यांनी मद्यपान केल्याची लोणीकर यांची तक्रार आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

मुख्याधिकारी पाटील यांना वैद्यकीय तपासणीसाठी ताब्यात घेतले आहे. मद्यपान चाचणी करण्यासाठी पिंपरीतील वायसीएमएच रुग्णालयात नेण्यात आले आहे.

### कारवाईच्या भीतीने दार लावून बसले

ही धडक त्यांनी मद्यपान केल्याचे अद्याप समोर आले नसले तरी त्याची तपासणी करण्याचे काम सुरू आहे. त्यांच्यावर तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तळेगाव दाभाडे येथे मुख्याधिकारी पाटील हे स्वतःची खाजगी गाडी चालवत होते. त्यांचा गाडीचा वेग खूप होता. त्यांनी वेगात समोर असलेल्या चारचाकीला आणि आणखी एका वाहनाला जोराची धडक दिली. ही धडक इतकी जोरात होती की, यात समोरच्या दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. अपघातानंतर मुख्याधिकारी घटनास्थळावरून थेट आपल्या घरी गेले आणि दार लावून बसले. या अपघाताबाबत पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी थेट मुख्याधिकाऱ्यांच्या घरी पोहचले. मात्र कारवाईच्या भीतीने त्यांनी काही वेळ दार उघडले नसल्याची माहिती समोर आली आहे. मात्र नंतर त्यांनी दार उघडले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी पिंपरी चिंचवड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर त्यांच्या मद्यप्राशन केल्याची माहिती समोर येणार आहे.

## कर संकलन विभागाची ट्वेंटी ट्वेंटी स्टाईल ‘बॅटिंग’


# साठ दिवसांत 300 कोटी वसूल..!

### सवलतींचा लाभ घेण्यासाठी तत्काळ कर भरणा करण्याचे महापालिकेचे आवाहन

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाची ट्वेंटी ट्वेंटी क्रिकेट स्टाईल ‘बॅटिंग’ सुरू असून अवघ्या 60 दिवसांत तब्बल 308 कोटींचा कर वसूल करण्यात आला आहे. विविध कर सवलतींचा लाभ घेत 2 लाख 71 हजार 503 मालमत्ता धारकांनी आपला कर भरणा केला आहे. तसेच 30 जूनपर्यंत असलेल्या कर सवलतींचा लाभ घेऊन कराचा भरणा करावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.**






शहरात 6 लाख 30 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. गतवर्षी विभागातर्फे राबविलेले विविध उपक्रम, जनजागृती, जप्ती मोहीम, नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे यासह सलग दुसऱ्यावर्षी महिलांच्या सिध्दी प्रकल्पा अंतर्गत बिलांचे घरपोच आणि वेळेत वाटप करण्यात आले आहे. याचीच फलनिष्पत्ती म्हणून मालमत्ता धारक कर संकलन कार्यालयासमोर अक्षरशः रांगा लावून कराचा उत्स्फूर्तपणे कर भरत असल्याचे चित्र प्रथमच दिसून येत आहे. यावरून शहरवासीयांनी शहर विकासात हातभार लावण्याची एक प्रकारे जबाबदारी स्वीकारली आहे. 6 लाख 30 हजार मालमत्तांपैकी 2 लाख 71 हजार 503 मालमत्ता धारकांनी 308 कोटी 42 लाख 31 हजार रुपयांचा कर जमा केल्याचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.

#### कर भरण्यात निवासी मालमत्ता धारकांची आघाडी..

2 लाख 71 हजार 503 मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे. यामध्ये तब्बल 2 लाख 39 हजार 40 निवासी मालमत्ता धारकांनी आपल्या कराचा भरणा केला आहे. त्यानंतर 20 हजार 799 बिगर निवासी, 6 हजार 88 मिश्र,1 हजार 972 औद्योगिक तर 1661 मोकळ्या जमीन असणाऱ्या मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे.

#### असा आला रुपया..

ऑनलाइन-218 कोटी 29 लाख
विविध ॲप- 8 कोटी 48 लाख
रोख-19 कोटी 32 लाख
धनादेशाद्वारे-12 कोटी 81लाख
एनइफटी -9 कोटी 21 लाख
इडीसी- 1 कोटी 71 लाख
आरटीजीएस-1 कोटी 72 लाख
डीडी-70 लाख 85 हजार

#### योजनांचा लाभ घेण्यासाठी तत्काळ कर भरावा ..

गतवर्षी सिध्दी प्रकल्पा अंतर्गत महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप करण्यात आले होते. करदात्यांनी कर भरण्यास मोठी गर्दी केली होती.

त्यामुळे जूनमध्ये अनेक नागरिकांना कर भरता आला नाही. यंदा जूनच्या शेवटी गर्दी टाळण्यासाठी ज्यांना ज्यांना बिले मिळत गेली अशा नागरिकांना 31 मे पूर्वी कर भरण्याचे एसएमएसव्दारे आवाहन करण्यात आले होते. त्यामुळे काही नागरिकांचा सवलत योजनांबाबत गैरसमज झाला. मात्र, नागरिकांची एकाचवेळी गर्दी होऊ नये म्हणून बिले मिळताच कर भरावा, असे सांगण्यात आले होते. तसेच कर सवलत योजना बिलामध्ये नमुद केल्याप्रमाणे 30 जूनपर्यंत लागू असून नागरिकांनी महिन्याच्या अखेरपर्यंत वाट न बघता, रांगेत जास्त वेळ उभा राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी योजनांचा लाभ घेऊन तत्काळ कराचा भरणा करावा.

#### ऑनलाइन कर भरण्यास नागरिकांची पसंती..

कर संकलन विभागाने सर्व सेवा सुविधा ऑनलाइनच्या उपलब्ध करून दिल्या आहेत. या सेवांचा मालमत्ता धारकांना प्रचंड मोठा फायदा होत असून करदाते दिवसेंदिवस ‘हायटेक’ होत आहेत. तसेच ऑनलाइन कर भरणाऱ्यांना नागरिकांना 5 टक्के सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे 2024-25 च्या आर्थिक वर्षांतील दोन महिन्यात 1 लाख 99 हजार 807 नागरिकांनी 218 कोटी 29 लाख 29 हजार रूपयांचा ऑनलाइन कराचा भरणा केला आहे.

#### तीन महिन्यांत पाचशे कोटींचे उद्दिष्ट..

गतवर्षी पहिल्या तिमाहीत साडेचारशे कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला होता. यामध्ये 35 कोटी उपयोग कर्ता शुल्काचे होते. तर 2024-25 या आर्थिक वर्षातील दोन महिन्यात 308 कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात आला आहे. असे असले तरी कर संकलन विभागाने पहिल्या तिमाहीत पाचशे कोटींचा कर वसूल करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार विविध माध्यमांतून प्रयत्न केले जात असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली.

#### वाकड झोनमध्ये सर्वाधिक भरणा..

कर संकलनासाठी शहरात 17 झोन आहेत. यामध्ये वाकड झोनमध्ये सर्वाधिक 39 हजार 759, सांगवीमध्ये 29 हजार 382, चिंचवडमध्ये 24 हजार 124, थेरगावमध्ये 24 हजार 727, पिंपरी वाघेरेमध्ये 18 हजार 529 मालमत्ता धारकांनी आपल्या कराचा भरणा केला आहे. तर सर्वात कमी पिंपरी नगर झोनमध्ये फक्त 3 हजार 19 मालमत्ता धारकांनी कर भरला आहे.

---

## हभप नितीन महाराज मोरे यांना पिंपरी-चिंचवड समाजभूषण पुरस्कार

### दिवंगत महापौर भिकू वाघेरे-पाटील प्रतिष्ठानतर्फे येत्या गुरुवारी विविध कार्यक्रम

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील प्रतिष्ठानच्या वतीने दिवंगत महापौर भिकू वाघेरे पाटील यांच्या 38 व्या स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन गुरूवारी (दि.6) पिंपरी वाघेरे येथील नवमहाराष्ट्र विद्यालय मैदान येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमात देहू गाव येथील हभप नितीन महाराज मोरे यांना पिंपरी-चिंचवड समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष तथा माजी महापौर संजोग वाघेरे पाटील यांनी मंगळवारी (दि.1) पत्रकार परिषदेत दिली.**



मोरवाडी, पिंपरी येथे झालेल्या पत्रकार परिषदेला भिकू वाघेरे (पाटील) प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष संजोग वाघेरे पाटील, प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब वाघेरे, जयवंत शिंदे, रमेश गोलांडे, अण्णा कापसे, सुरेश झिटे, गणेश वाघेरे, किसन (आप्पा) वाघेरे, बिपिन नाणेकर, निशाण गवळी, विलास भोंडवे, प्रशांत खुळे, संजय लंके यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

संजोग वाघेरे पाटील यांनी सांगितले की, दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित केले जाते. यंदाही विविध समाजपयोगी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. नवमहाराष्ट्र विद्यालय येथील दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे यांच्या पुतळ्यास सकाळी नऊला पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी 9.30 वाजता रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यात देहू गावचे हभप नितीन महाराज मोरे यांना पिंपरी-चिंचवड समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात सन्मानित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे संयोजन दिवंगत महापौर कै. भिकू वाघेरे पाटील प्रतिष्ठानच्या पदाधिकारी व ग्रामस्थांनी केले आहे.

#### विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी उपस्थित राहणार

कार्यक्रमास आमदार अण्णा बनसोडे, आमदार अश्विनी जगताप, माजी आमदार गौतम चाबुकस्वार, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, अजित गव्हाणे, सचिन भोसले, प्रचारप्रमुख योगेश बाबर, माजी महापौर योगेश बहल, माजी महापौर मंगलताई कदम, माजी विरोधी पक्षनेते राजू मिसाळ, नाना काटे, माजी गटनेते राहुल कलाटे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेवक मारूती भापकर, मानव कांबळे, माजी नगरसेविका उषाताई वाघेरे, माजी विरोधी पक्षनेते दत्तात्रय वाघेरे आणि विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक उपस्थित राहणार आहेत.

# मी माणुसकी बोलत आहे..!



## भूमिका

**अगदीच पूर्वी नाही काही दशकांपूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी सऱ्हास नाहीतर काही तुरळक ठिकाणी दिसायची आपल्यामध्ये किंवा आजूबाजूला फार मोकळा नाही पण वावर असायचा. कुणी हाक मारली तर लाखोमधून काहींचा ओंडका यायचा मदत करायचा पण हल्ली माझे प्रमाण कमी झाले आहे . मी माझ्या पुरते विचार करण्यात, जगण्यात गर्क आहे. होय मी तुझ्या माझ्यातील माणुसकी बोलत आहे .**

पूर्वी असे व्हायचे पूर्वी म्हणजे फार प्राचीन काळी ,त्यावेळी गरजा कमी होत्या संसाधने कमी होते, आधुनिकपणा तर नसल्यात जमा होता. त्यावेळी सगळे एकमेकांना सहज उपलब्ध व्हायचे. सुखात दुःखात सहभागी व्हायचे. असेल त्यात समाधानी राहायचे. कुणी वाटसरू असेल, तर त्याला पाहुणचार ते पार मुक्कामापर्यंत आग्रह असायचा. जाताना सुद्धा त्याला सोबत शिडोरी द्यायचे . इतके संवेदनशील , समाजशील त्यावेळी लोकं होती. आता तर एकाच अपार्टमेंट मध्ये वर्षानी वर्ष राहून सुद्धा संवाद होत नाही. एखादी अप्रिय घटना घडली . ती टीव्ही, न्युज पेपर यामधून माहिती पडते. कोणी बाजूचा मदत मागायला आला तर दार उघडल्या जात नाही. आजूबाजूंच्या लोकांशी संपर्कात नाही. इंटरनेट द्वारा जगाशी संपर्क साधण्यात व्यस्त असलेली सध्याची पिढी नेमकी प्रॅक्टिकल या नावाखाली कोणत्या विकृत कल्पनेत जगत आहे .याचे भान त्यांना सुध्दा नाही. होय मी



तुझ्या माझ्यातील माणुसकी बोलत आहे फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम, एक्स, स्नॅपचॅट असे असंख्य ऐपच्या आपण आपल्या स्टेटसला मोटिवेशनल थॉट्स ठेवत असतो. सगळ्यांनी एक रहावे. संपर्क करावे. असे सांगत असतो. चांगले विचार किती महत्त्वाचे, वाईट विचार किती निंदनीय आहे. असे सांगत असतो. पण आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटनांना आपण दुर्लक्षित करत असतो. एखाद्याचा एक्सीडेंट झाला तर त्याला मदत करायची सोडून त्याचा फोटो आपण सोशल मीडियाला शेअर करत असतो. पण त्याला उचलून हॉस्पिटलला न्यावे इतकेही मनात वाटत नाही. इतके कसे असवेतनशील आपण होऊ शकतो . ब्रेकिंग न्यूज च्या नादात एखाद्याचा जीव जाईल इतकी साधी कल्पनाही आपल्या डोक्यात न यावी, इतके कसे खुजे विचार आपले झाले आहेत . का? विचार करणे थांबले आहे. का? आपण सुद्धा हिंस्र पशु झालो आहोत. याचा विचार करावा. होय मी तुझ्या माझ्यातील माणुसकी बोलत आहे ..! एकत्रित कुटुंब पद्धतीतून मुक्त होत छोट्या कुटुंब पद्धतीकडे वळलेली आजची तरुण पिढी पुढे एकटीच राहण्यात मश्गुल होत आहे. असे चित्र स्पष्ट दिसत आहे. यापेक्षा भयावह काय असणार आहे. मान्य आहे. सुख सुविधा वाढत जात आहे. पण या सुख सुविधांमुळे माणसा माणसातील दुरावा वाढत चालला आहे. हे सुद्धा विसरता कामा नये. आपण जसे पेरत आहे. तसे पुढची पिढी घेत आहे. नुसती घेत नाही तर त्यामध्ये अजून ॲडव्हान्स काय होणार हे सुद्धा त्यामध्ये ते अनुकरण करत आहे. मग ते अनुकरण चांगले असो की वाईट त्यांना त्याची पर्वा नाही. कारण आपणही तशी पर्वा केली नव्हती. आईला आई नाही तर मॉम वडिलांना वडील नाहीतर पॉप म्हणत आता थेट त्यांचे नाव एकेरी नावाने हाक देत ते बोलत आहे. होय! मी तुझ्या माझ्यातील माणुसकी बोलत आहे. पूर्वी मोठ्यांना बोलावण्याची पद्धत याना-त्यांना, आपण पासून तर या तंत्रज्ञानाच्या काळात तू तर थेट एकेरी नावाने हाका मारल्या जात आहे. संस्काराच्या नावाखाली कुसंस्कारचा भरणा देत आहे. हात जोडून नमस्कारापासून तर थेट गालाला गाल घासे पर्यंत (जणू त्यामधून जीनी येणार) आणि त्याहीपुढे काही चुकीच्या पद्धतीने पुढच्या व्यक्तीला वाईट वाटेपर्यंत स्वागत सुरू आहे. होय मी तुझ्या माझ्यातील माणुसकी बोलत आहात..! काळातील मित्रानो माणुसकी म्हणजे चांगले विचार बोलणे ,लिहिणे किंवा नुसते सांगणे नसून ते विचार अंगीकारणे होय. त्यामधून समाजप्रबोधन करणे होय. वेळेनुसार गरजूंना मदत करणे . योग्य तो बदल स्वीकारणे होय . बदलच्या नावाखाली भोंगडा कारभार करणे नाही . एक सांगू मित्रांनो माणुसकी बोलून, सांगून किंवा दाखवून दिसत नाही तर ती तुमच्या कार्यातून, कर्मातून दिसून येते. माणुसकी म्हणजे एखाद्या गरजूंना योग्य ती मदत करणे,जर आपण सक्षम नसेल तर ती मदत कोठे मिळते वा कोठे मिळेल किंवा तिथे जाऊन मिळून देता येईल किंवा योग्य तो मार्ग दाखविणे होय.

## प्रासंगिक »

# बुडबुडा फुटला तर?

***वैद्यकीय आणि अभियांत्रिकी यासारखे व्यावसायिक अभ्यासक्रम मधूनच सोडणाऱ्या मुलांची संख्या पाहिली तर प्रश्न पडतो की, 'दहावी-बारावीचे हे भरमसाठ मार्क म्हणजे बुडबुडा तर नाही?***

गेल्या पाच वर्षात दीड हजार मुलांनी वैद्यकीय शिक्षण अर्धवट सोडून दिले आहे. तसेच वैद्यकीय पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १२२ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

खरंतर सगळ्यांनाच असं वाटत की, दहावी हा आयुष्यातला एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि दहावीत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळायलाच हवेत. आजकाल बऱ्याच मुलांना ते मिळतातही. नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात ते समोरही आलं. यावर्षी राज्यात ८१ हजार ९९१ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण आहेत, तर जवळपास १८७ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण आहेत. यासारखेच निकाल गेल्या काही वर्षात लागत आहेत. पण हे ९० टक्के आणि त्यापुढे पडणारे गुण म्हणजेच गुणवत्ता आहे का?, असा प्रश्न पडतो. याला कारणही तसंच आहे.

कर्करोग हा मृत्यूला कारणीभूत असणारा सर्वसामान्य आजार आहे कर्करोग हा शरीरातील पेशींच्या अनियमित वाढीमुळे उद्भवणारा रोग आहे आज जगामध्ये 200 हून अधिक प्रकारच्या कॅन्सरचा शोध लागलेला आहे. आज रोजी कॅन्सर हा कोणत्याही अवयवांमध्ये होऊ शकतो.

# तंबाखू सोडा, जीव वाचवा!

सामान्यपणे पेशी विभाजन क्रमाक्रमाने व नियंत्रित पद्धतीने होते शरीराच्या आवश्यकतेनुसार नव्या पेशी जुन्या पेशंटची जागा घेतात कधीकधी पेशी विभाजन आवश्यकता नसतानाही होत राहते तेव्हा अतिरिक्त पेशींची गाठ किंवा ट्यूमर तयार होते. ग्लोबल कॅन्सर स्टॅटिस्टिक्स नुसार भारत देश हा सध्या कॅन्सरची राजधानी बनलेला आहे दरवर्षी जवळपास 50 हजार मृत्यू हे फक्त कॅन्सर मुळे होतात त्याचप्रमाणे 75 हजार नवीन कॅन्सरचे रुग्ण आढळतात बहुतांश मुख कर्करोग हा तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे होतो. कॅन्सर हा रोग सामान्यतः 38 ते 75 या वयोगटांमध्ये आढळतो जे लोक तंबाखू चघळतात त्यांना तहान कमी लागते आणि तंबाखू मधील निकोटीन व इतर विष तुमच्या रक्तामध्ये मिसळते त्याचप्रमाणे तंबाखू तोंडाच्या आत मध्ये जेथे ठेवतात त्या ठिकाणी पांढऱ्या रंगाचा चट्टा तयार होतो



हा चट्टा म्हणजेच मुख कर्करोगाची पूर्व सूचना समजावे तसेच जे लोक बिडी सिगरेट पितात त्यांचे ओठ व टाळू कालांतराने काडे पडत जाते व त्यांना फुफुसाचा कॅन्सर होण्याची शक्यता असते.कॅन्सर होण्यापूर्वीची अवस्था म्हणजे तोंड हळूहळू कमी उघडते व नंतर तोंड उघडणे अशक्य होते कॅन्सर होण्याचे दुसरे कारण म्हणजे एचपीव्ही व्हायरस या प्रकारचे कॅन्सरचे प्रमाण भारतामध्ये तसे फार कमी आहे.

कॅन्सर हा पूर्णपणे बरा होतो परंतु गरज आहे त्यावर लवकरात लवकर उपचार निदान व उपचार करण्याची जेवढ्या लवकर निदान होईल तेवढ्याच चांगल्या प्रकारे यशस्वी उपचार करण्यात येतो पण भारतामध्ये रुग्ण हे स्वतःचे नीट काळजी घेत नाहीत ते दवाखान्यांमध्ये उशिरा पोहोचतात ग्रामीण भागातील रुग्ण स्वतः मेडिकल मधून गोळ्या किंवा काही घरगुती उपाय करतात व ते डॉक्टर पर्यंत खूप जास्त कॅन्सरचा प्रसार झाल्यानंतर पोहोचतात तोपर्यंत कॅन्सर हा तिसरा किंवा चौथ्या स्टेजमध्ये गेलेला असतो अशा स्टेजमध्ये कॅन्सर पासून संरक्षण करणे हे अत्यंत कठीण होऊन जाते पण याउलट जर तुम्ही अत्यंत लवकरच निदान करून जर उपचार घेतला तर कॅन्सर हा पूर्णपणे बरा होतो पहिल्या किंवा दुसऱ्या स्टेजमध्ये असलेले कॅन्सर हे ऑपरेशन रेडिओथेरपी किंवा किमोथेरपी इत्यादी नी बरे केले जातात काही ॲडव्हान्स स्टेज मध्ये गेलेले पेशंट पेशंटचे आयुष्य वाढवू शकतो म्हणून माझी जे तंबाखू खातात त्यांना विनंती आहे की तंबाखू सोडा आणि जीवन वाचवा...

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुख्यमंत्र्यांच्या गुरांना हिरवागार चारा!

## सामान्य शेतकऱ्यांच्या गुरांना कोरडा चाराही मिळत नाही

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाणी टंचाईमुळे महाराष्ट्रात तीव्र दुष्काळाची परिस्थिती जाणवत आहे. २० मे रोजी महाराष्ट्रात पाच टप्प्यातील मतदान संपन्न झाल्यानंतर राज्यातील दुष्काळाच्या झळांचे चित्र माध्यमातून दिसण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे काही दिवस सातारा जिल्ह्यातील आपल्या गावी गेले होते. यावेळी त्यांनी नेहमीप्रमाणे आपल्या शेत-शिवारात वेळ घालवला. त्यांचा एक व्हिडीओ विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली आहे.**




महाराष्ट्रातील ही दोन चित्र मुख्यमंत्र्यांच्या गुरांना हिरवागार चारा आणि दुसरीकडे मराठवाड्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या गुरांना कोरडा चाराही मिळत नाहीये. गुरांचा चारा आणि पाण्याची सोय करण्यासाठी शेतकरी कुटुंबांना घरातील स्त्रीचे सोने गहाण ठेवून पैश्याची जुळवाजुळव करण्याची वेळ आली आहे आणि महायुती सरकार मात्र अजूनही ढिम्मच! आचारसंहितेचे कारण दाखवून सत्ताधारी स्वतःच्या बेजबाबदार कारभारावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करत आहे हे महाराष्ट्र बघत आहे!", अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी एक्स वर आणखी एक पोस्ट टाकत कृषीमंत्र्यांवरही टीका केली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे परदेशात गेले असल्याची टीका त्यांनी केली. "राज्यातील शेतकरी दुष्काळात होरपळत असताना सरकार आणि प्रशासन मात्र स्वतःच्या वेगळ्या दुनियेत व्यस्त आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना कोणतीही मदत सरकारकडून अजून मिळालेली नाही. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी काँग्रेसने दुष्काळ संदर्भात नेमलेल्या विदर्भाच्या समितीची आज बैठक पार पडली. ५ जून पासून विदर्भात काँग्रेस पाहणी दौरा करून त्यासंदर्भात अहवाल राज्य सरकार पुढे मांडून शेतकऱ्यांसाठी आम्ही मदतीची मागणी करणार आहोत", असे ते म्हणाले.विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले, "शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून कृषी मंत्री बाहेर आहेत, ते बाहेर असताना आयुक्तांची बदली होते.पूर्णवेळ सचिव नाही. खरीप हंगाम तोंडावर असताना बैठक होत नाही खतांचा तुडवडा आहे, बियाणाचे दर वाढले, बियाण्यांसाठी लोक रांगेत उभे आहेत. या सर्व परिस्थितीवर उपाययोजना करण्याऐवजी सत्ताधारी परदेशात मजा मारत आहेत. शेतकरी जगला काय आणि मेला काय या सरकारला काय फरक पडतो? राज्यातील शेतकऱ्यांप्रती महायुती सरकारची अनास्था यामधून दिसत आहे."महाराष्ट्रातील ही दोन चित्र मुख्यमंत्र्यांच्या गुरांना हिरवागार चारा आणि दुसरीकडे मराठवाड्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या गुरांना कोरडा चाराही मिळत नाहीये. गुरांचा चारा आणि पाण्याची सोय करण्यासाठी शेतकरी कुटुंबांना घरातील स्त्रीचे सोने गहाण ठेवून पैश्याची जुळवाजुळव करण्याची वेळ आली आहे आणि महायुती सरकार मात्र अजूनही ढिम्मच! आचारसंहितेचे कारण दाखवून सत्ताधारी स्वतःच्या बेजबाबदार कारभारावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करत आहे हे महाराष्ट्र बघत आहे!", अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी एक्स वर आणखी एक पोस्ट टाकत कृषीमंत्र्यांवरही टीका केली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे परदेशात गेले असल्याची टीका त्यांनी केली. "राज्यातील शेतकरी दुष्काळात होरपळत असताना सरकार आणि प्रशासन मात्र स्वतःच्या वेगळ्या दुनियेत व्यस्त आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना कोणतीही मदत सरकारकडून अजून मिळालेली नाही. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी काँग्रेसने दुष्काळ संदर्भात नेमलेल्या विदर्भाच्या समितीची आज बैठक पार पडली. ५ जून पासून विदर्भात काँग्रेस पाहणी दौरा करून त्यासंदर्भात अहवाल राज्य सरकार पुढे मांडून शेतकऱ्यांसाठी आम्ही मदतीची मागणी करणार आहोत", असे ते म्हणाले.विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले, "शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून कृषी मंत्री बाहेर आहेत, ते बाहेर असताना आयुक्तांची बदली होते.पूर्णवेळ सचिव नाही. खरीप हंगाम तोंडावर असताना बैठक होत नाही खतांचा तुडवडा आहे, बियाणाचे दर वाढले, बियाण्यांसाठी लोक रांगेत उभे आहेत.

### बेजबाबदार कारभारावर पांघरूण

महाराष्ट्रातील ही दोन चित्र मुख्यमंत्र्यांच्या गुरांना हिरवागार चारा आणि दुसरीकडे मराठवाड्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या गुरांना कोरडा चाराही मिळत नाहीये. गुरांचा चारा आणि पाण्याची सोय करण्यासाठी शेतकरी कुटुंबांना घरातील स्त्रीचे सोने गहाण ठेवून पैश्याची जुळवाजुळव करण्याची वेळ आली आहे आणि महायुती सरकार मात्र अजूनही ढिम्मच! आचारसंहितेचे कारण दाखवून सत्ताधारी स्वतःच्या बेजबाबदार कारभारावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करत आहे.

# जयंत पाटील ४ जूननंतर काँग्रेसमध्ये प्रवेश करणार

## सुरज चव्हाणः देशामध्ये सध्या परिवर्तनाची लाट सुरु झाली : नाना पटोले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान आज पार पडत आहे. या निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. या निकालाच्या आधी इंडिया आघाडी आणि भाजपाचे नेते आपआपली मत व्यक्त करत आहेत. असातच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते महेबुब शेख यांनी अजित पवार गट फूटणार असल्याचं विधान केलं होतं. त्यांच्या विधानानंतर अजित पवार गटाकडून प्रत्युत्तर देण्यात आलं.**

सूरज चव्हाण यांनी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे ४ जूननंतर काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा केला. त्यावर शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी आपली प्रतिक्रिया देत सूचक विधान केलं. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आलं. यावर अद्याप जयंत पाटील यांची प्रतिक्रिया समोर आलेली नाही. दरम्यान, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले माध्यमांशी संवाद साधत असताना त्यांना 'जयंत पाटील काँग्रेसमध्ये आले तर घेणार का?', असा प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी यासंदर्भात मोठं विधान केलं.लोकसभा निवडणुकीच्या ४ जूनच्या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि एकनाथ शिंदे गट रहील की नाही हा



महत्वाचा प्रश्न आहे. देशभरात पुन्हा अनेक नेते काँग्रेसमध्ये यायला लागले आहेत. त्यामुळे राज्यातही आणि महाराष्ट्रात अशा घडामोडी पाहायला मिळतील", असं नाना पटोले म्हणाले. जयंत पाटील आले तर तुम्ही पक्षात घेणार का? असा प्रश्न नाना पटोले यांना विचारण्यात आला. यावर बोलताना ते म्हणाले, "देशामध्ये सध्या परिवर्तनाची एक लाट सुरू झाली आहे. त्यामुळे पक्षातील हायकमांड यावर जो निर्णय घेतील त्या निर्णयाचं आम्ही सर्वजण समर्थन करू", अशी सूचक प्रतिक्रिया नाना पटोले यांनी दिली.१० जून रोजी राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत शरद पवार गटातील अनेक नेत्यांचा पक्षप्रवेश होणार आहे. याचबरोबर अजित पवारांवर विश्वास ठेवून अनेक ज्येष्ठ नेते पक्षात येणार आहेत. ४ जूनच्या निकालानंतर शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील सुद्धा काँग्रेसमध्ये जाणार आहेत. त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांची वेळही मागितली आहे. त्यांचा पक्षप्रवेशाचा मुहूर्त ठरलेला आहे. ४ जूननंतर शरद पवार गट रिकामा होईल", असं सूरज चव्हाण यांनी म्हटलं होतं.संजय शिरसाट यांनी जयंत पाटील यांच्याबाबत बोलताना म्हटलं, "राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात उलथापालथी होणार आहेत. शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्याबरोबर ज्यांनी काम केलं.

### नाना पटोले काय म्हणाले?

, त्यांना आता रोहित पवारांचं ऐकावं लागत आहे. सुप्रिया सुळे आणि रोहित पवार हुकूमशाही पद्धतीने काम करत आहेत. रोहित पवारांमुळे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा एक पाय पक्षाबाहेर आहे", असं सूचक विधान संजय शिरसाट यांनी केलं होतं.लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान आज पार पडत आहे. या निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. या निकालाच्या आधी इंडिया आघाडी आणि भाजपाचे नेते आपआपली मत व्यक्त करत आहेत. असातच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते महेबुब शेख यांनी अजित पवार गट फूटणार असल्याचं विधान केलं होतं.

# केजरीवालांना आत्मसमर्पण करावं लागणार!

## 2 जून रोजी तिहार तुरुंगात आत्मसमर्पण करावं लागणार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य धोरण प्रकरणामध्ये ईडीकडून अटक झाल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सर्वोच्च न्यायालयाने २१ दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला होता. यानंतर आता २१ दिवसांच्या जामीनाची मुदत आज म्हणजे १ जून रोजी संपत आहे. त्यामुळे २ जून रोजी अरविंद केजरीवाल यांना तिहार तुरुंगात आत्मसमर्पण करावं लागणार आहे.**



जामीन मिळण्याच्या याचिकेवर आज (१ जून) सुनावणी झाली. या याचिकेवरील निर्णय राऊस अव्हेन्यू न्यायालयाने ५ जूनपर्यंत निर्णय राखून ठेवला आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या वैद्यकीय चाचणीसाठी ७ दिवसांचा जामीन मागितला होता. मात्र, या जामीनाला अंमलबजावणी संचालनालयाने न्यायालयात विरोध केला. तसंच अरविंद केजरीवाल यांच्या आरोग्याबाबत त्यांच्याकडून खोटी विधाने करण्यात येत असल्याचा आरोप करत केजरीवालांनी तथ्ये लपवल्याचं ईडीने म्हटलं. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी प्रकृतीच्या कारणास्तव मागितलेल्या अंतरिम जामिनाला ईडीने विरोध करताना ईडीने सांगितलं की, अरविंद केजरीवाल यांनी सर्व राज्यांमध्ये प्रचार केला. त्यांची वैद्यकीय चाचणी झाली नाही. आता आत्मसमर्पणाच्या वेळी ते वैद्यकीय कारणास्तव अंतरिम जामीन मागत आहे. केजरीवाल चाचणीला विलंब करून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. तसंच त्यांनी ७ किलोने वजन कमी झाल्याचा

### 5 जूनपर्यंत निर्णय राखून ठेवला

तसंच त्यांनी ७ किलोने वजन कमी झाल्याचा खोटा दावा केला असल्याचंही ईडीने म्हटलं.यावर केजरीवाल यांच्या वकीलांकडून सांगण्यात आलं की,'राष्ट्रीय पक्ष असलेल्या आम आदमी पक्षाच्या निवडणूक प्रचारासाठी अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला होता. आता ही याचिका सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला मुदतवाढ देण्यासाठी नसून वैद्यकीय जामिनासाठी आहे, असं केजरीवाल यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितलं. यानंतर या याचिकेवरील निर्णय राऊस अव्हेन्यू न्यायालयाने ५ जूनपर्यंत निर्णय राखून ठेवला. दरम्यान, अरविंद केजरीवाल यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे जामीनाची मुदती वाढवून मागितली होती.

खोटा दावा केला असल्याचंही ईडीने म्हटलं.यावर केजरीवाल यांच्या वकीलांकडून सांगण्यात आलं की,'राष्ट्रीय पक्ष असलेल्या आम आदमी पक्षाच्या निवडणूक प्रचारासाठी अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला होता. आता ही याचिका सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला मुदतवाढ देण्यासाठी नसून वैद्यकीय जामिनासाठी आहे, असं केजरीवाल यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितलं. यानंतर या याचिकेवरील निर्णय राऊस अव्हेन्यू न्यायालयाने ५ जूनपर्यंत निर्णय राखून ठेवला. दरम्यान, अरविंद केजरीवाल यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे जामीनाची मुदती वाढवून मागितली होती. मात्र, हा मुदतीचा अर्ज सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रारनेच फेटाळून लावला होता. अरविंद केजरीवाल यांच्यावतीने अंतरिम जामिनाची मुदत वाढवून मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत तत्काळ सुनावणी घेण्याची मागणी केली होती. मात्र, या तत्काळ सुनावणीला सुनावणीला नकार दिला होता. त्यानंतर आज राऊस अव्हेन्यू न्यायालयानेही वैद्यकीय कारणास्तवआहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या वैद्यकीय चाचणीसाठी ७ दिवसांचा जामीन मागितला होता. मात्र, या जामीनाला अंमलबजावणी संचालनालयाने न्यायालयात विरोध केला. यांच्या आरोग्याबाबत त्यांच्याकडून खोटी विधाने करण्यात येत असल्याचा आरोप करत केजरीवालांनी तथ्ये लपवल्याचं ईडीने म्हटलं.मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी प्रकृतीच्या कारणास्तव मागितलेल्या अंतरिम जामिनाला ईडीने विरोध करताना ईडीने सांगितलं की, अरविंद केजरीवाल यांनी सर्व राज्यांमध्ये प्रचार केला. त्यांची वैद्यकीय चाचणी झाली नाही. आता आत्मसमर्पणाच्या वेळी ते वैद्यकीय कारणास्तव अंतरिम जामीन मागत आहे. केजरीवाल चाचणीला विलंब करून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत.

# मोदींनी ध्यानधारणा करून सूर्याला शांत केलं


## रवी किशन मोदींच्या बचावासाठी पुढे सरसावले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या दीड महिन्यांपासून लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उडत होता. गुरुवारी सर्व पक्ष आणि उमेदवारांच्या प्रचारसभा थंडावल्या. आज लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया पार पडत आहे. या टप्प्यातील मतदानाच्या ३६ तास आधी म्हणजेच गुरुवारी सायंकाळी आचारसंहिता लागू झाली आणि देशभरातील लोकसभेचा प्रचार थांबला.**

यंदाची लोकसभा निवडणूक तब्बल सात टप्पे चालली. या सात टप्प्यांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तब्बल २०६ प्रचारसभा घेतल्या. तसेच ८० हून अधिक मुलाखती देखील दिल्या. प्रचारसभांचं द्विशतक झळकावल्यानंतर पंतप्रधान मोदी ध्यान करू लागले आहेत. मोदी यांनी यांचे ध्यानधारणा करतानाचे अनेक फोटो, व्हिडीओ समाजमाध्यमांवर पाहायला मिळत आहेत. त्यामुळे मोदी हे कॅमेऱ्यासमोर बसून ध्यानधारणा करत असल्याची टीका त्यांच्यावर होऊ लागली आहे. अशातच भाजपाचे गोरखपूर लोकसभेचे उमेदवार आणि भोजपुरी अभिनेते रवी किशन हे मोदींच्या बचावासाठी पुढे सरसावले आहेत.



आश्वासन दिले होते. लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यात उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगालसह एकूण आठ राज्यांमध्ये आज मतदान होत आहे. उत्तर प्रदेशच्या पूर्वांचल भागातील मतदारसंघांमध्ये मतदान चालू आहे. दरम्यान, गोरखपूरमध्ये मतदान केल्यानंतर भाजपा खासदार रवी किशन यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदींच्या ध्यानधारणेबाबत मोठं वक्तव्य केलं.रवी किशन म्हणाले, आज हवामान खूप चांगलं आहे. तिकडे (कन्याकुमारी) पंतप्रधान मोदी ध्यानधारणा करायला बसले आणि सूर्यदेव शांत झाले. मोदींनी त्यांच्या ध्यानधारणेतून सूर्यदेवतेला शांत

### कॅमेऱ्यासमोर बसून ध्यानधारणा

यंदाची लोकसभा निवडणूक तब्बल सात टप्पे चालली. या सात टप्प्यांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तब्बल २०६ प्रचारसभा घेतल्या. तसेच ८० हून अधिक मुलाखती देखील दिल्या. प्रचारसभांचं द्विशतक झळकावल्यानंतर पंतप्रधान मोदी ध्यान करू लागले आहेत. मोदी यांनी यांचे ध्यानधारणा करतानाचे अनेक फोटो, व्हिडीओ समाजमाध्यमांवर पाहायला मिळत आहेत. त्यामुळे मोदी हे कॅमेऱ्यासमोर बसून ध्यानधारणा करत असल्याची टीका त्यांच्यावर होऊ लागली आहे. अशातच भाजपाचे गोरखपूर लोकसभेचे उमेदवार आणि भोजपुरी अभिनेते रवी किशन हे मोदींच्या बचावासाठी पुढे सरसावले आहेत.

केलं आहे. ही ऐतिहासिक घटना आहे. इतके दिवस भीषण उन्हाळा असताना आज गार वारा सुटलाय. हा रामराज्याचा मोठा संकेत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा विराट रुपात येतील. ज्यामुळे माझा भारत विराट, विकसित आणि सोन्याची चिमणी (सोने की चिड़िया) बनेल. हा भारत कोणासमोर झुकणार नाही. संपूर्ण जग या भारतासमोर नतमस्तक होईल, एक मबजूत भारत आता बनू लागला आहे.

# अमिताभ बच्चन यांना यंदाचा लता मंगेशकर पुरस्कार

बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमिताभ बच्चन यांचा जलवा अजूनही कायम आहे. त्यांना ही नावं आणि प्रसिद्धी इतक्या सहजासहजी मिळाली नाहीत. प्रत्येक कलाकारांच्या वाटेला संघर्ष असतोच. तसाच बिग बींना देखील करिअरच्या सुरुवातीपासूनच खूप संघर्ष करावा लागला. या सिनेसृष्टीत त्यांना जवळपास पाच दशक पूर्ण झाली आहेत. या पाच दशकात त्यांनी अनेक हिट चित्रपट दिले आहेत. त्यामुळे सिनेसृष्टीतील बिग बींच्या या कारकीर्दीबद्दल आणि योगदानाबद्दल यंदा त्यांना लता दीनानाथ मंगेशकर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. गेल्यावर्षी लता दीनानाथ मंगेशकर हा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रदान करण्यात आला होता. यंदा हा पुरस्कार अमिताभ बच्चन यांना जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्राचा मानाचा पुरस्कार सोहळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती पुरस्कार सोहळ्याची आज घोषणा झाली. पंडित हृदयनाथ मंगेशकर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आणि आदिनाथ मंगेशकर यांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळ्याची घोषणा करण्यात आली. दीनानाथ मंगेशकर यांच्या ८२व्या पुण्यतिथीनिमित्ताने एप्रिलला हा पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. दीनानाथ नाट्यगृह येथे हा सोहळा रंगणार आहे. या सोहळ्यात अमिताभ बच्चन यांच्यासह संगीत, नाटक, कला, वैद्यकीय, पत्रकारीता व सामाजिक कार्य क्षेत्रातील दिग्गजांचा सत्कार होणार आहे.

# सुयश शर्मा याच्याशी शाहरुखच्या गप्पा रंगल्या

बॉलीवूडचा किंग खान शाहरुख खान उत्तम अभिनेता तर आहेच पण आयपीएल सामन्यातील संघ 'कोलकाता नाइट रायडर्स'चा मालकदेखील आहे. आयपीएलच्या हंगामाला सुरूवात झाल्यापासून संपूर्ण भारतात क्रिकेटमय वातावरण झालं आहे. १४ एप्रिल रोजी रविवारी 'कोलकाता नाइट रायडर्स' विरुद्ध 'लखनऊ सुपर जायंट्स' यांचा सामना पार पडला. या सामन्यात कोलकाताने लखनऊवर ८ विकेट्सनी विजय मिळवला. या सामन्यानंतर शाहरुखने खेळाडूंची भेट घेतली.'कोलकाता नाइट रायडर्स' संघातील क्रिकेटपटू सुयश शर्मा याच्याशी शाहरुखच्या चांगल्याच गप्पा रंगल्या होत्या. फॅशन, लूक्समुळे नेहमीच चर्चेत असणाऱ्या शाहरुखला सुयशच्या हेयरस्टाईलची भुरळ पडली. याचाच व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होताना दिसतोय.शाहरुख खान क्रिकेटर सुयशला मैदानात भेटला. त्याने क्रिकेटरची गळाभेट घेतली. तेव्हा शाहरुखने क्रिकेटर सुयशची हेअरस्टाईल बघितली आणि त्याला ती प्रचंड आवडली. त्याने सुयशला विचारलं, "कोणाच्या सांगण्यावरून तू ही हेअरस्टाईल केली आहेस." यावर सुयश म्हणाला, "मी स्वत:च केली आहे."मैदानात गप्पा मारत असतानाच शाहरुखने त्याच्या मॅनेजर पूजा ददलानीला हाक मारली आणि सांगितले, "पूजा मला अशीच हेअरस्टाईल हवी आहे." यावर आजूबाजूला असलेले सगळे क्रिकेटर हसले.

# अनुष्काने दाखवली लेकाची झलक

अभिनेत्री अनुष्का शर्माने १५ फेब्रुवारी रोजी अकायला जन्म दिला. दुसऱ्या बाळाचं स्वागत करण्यासाठी जानेवारी महिन्यात विराट-अनुष्का लंडनला रवाना झाले होते. कुटुंबाला वेळ देण्यासाठी कोहलीने कसोटी सामन्यांमधून काही काळ ब्रेक घेतला होता. लेकाच्या जन्मानंतर आणि आयपीएलच्या निमित्ताने मार्च महिन्यात विराट कोहली एकटा भारतात आला. यावेळी चाहत्यांसह पापाराझींनी त्याच्याकडे अनुष्काबद्दल विचारपूस केली होती. गेल्या अनेक दिवसांपासून अभिनेत्री दोन्ही मुलांसह लवकरच भारतात परतणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. अखेर काही महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अनुष्का शर्मा तिची दोन्ही मुलं वामिका आणि अकायबरोबर भारतात परतली आहे. यासंदर्भात 'विरल भय्यानी' या पापाराझी इन्स्टाग्राम पेजवरून माहिती देण्यात आली आहे. शिवाय अनुष्काने पापाराझींना अकायसह वामिकाची झलक दाखवल्याचा दावा सुद्धा या पोस्टमध्ये करण्यात आला आहे.विराट कोहली आणि अनुष्का शर्माने २०१७ मध्ये लग्नगाठ बांधली. यानंतर तीन वर्षांनी अनुष्काने वामिकाला जन्म दिला. लेकीचा जन्म झाल्यावर तिचे कोणीही फोटो काढू नयेत असा अनुष्काचा कायम आग्रह होता. तिची हीच अट यापुढे सुद्धा कायम राहणार आहे. पापाराझींनी दिलेल्या माहितीनुसार, अनुष्का शर्माने लेक अकायची झलक विमानतळावर पापाराझींना दाखवली. तसेच "लवकरच निवांत आणि जेव्हा माझी मुलं माझ्याबरोबर नसतील तेव्हा मी फोटोसाठी पोज देईल." असं अभिनेत्रीने सांगितलं आहे.



# क्रिती खरबंदाच्या व्हिडीओची चर्चा

बॉलीवूड कपल पुलकित सम्राट आणि क्रिती खरबंदा यांचा विवाहसोहळा १५ मार्चला थाटामाटात पार पडला. पुलकित-क्रितीने मानेसरमध्ये लग्नगाठ बांधली. पुलकित-क्रितीच्या लग्नसोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले होते. १५ एप्रिलला पुलकित-क्रितीच्या लग्नाला एक महिना पूर्ण झाला. या निमित्ताने दोघांनी आपल्या सोशल मीडियावर लग्नसोहळ्यातील काही क्षण शेअर केले आहेत. नवरीची मंडपात एंट्री होताच पुलकितचे अश्रू अनावर झाले. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होतोय. क्रिती आणि पुलकितने या खास दिवशी एकमेकांसाठी छोटसं स्पीच तयार केलं होतं. यात त्यांनी एकमेकांबद्दल खूप सुंदर गोष्टी लिहिल्या होत्या. आपल्या भावना व्यक्त करत असताना दोघांचेही डोळे पाणावले होते.सप्तपदीच्या आधी पुलकित क्रितीला भेटायला आला होता. तेव्हा "ब्राईड ओ ब्राईड" अशी हाक मारत त्याने क्रितीला बोलावलं. पुलकितच्या हाकेनंतर क्रिती बाहेर आली आणि तिने त्याला घट्ट मिठी मारली. क्रितीने याचा व्हिडीओ तिच्या अधिकृत सोशल मीडियावर शेअर केला आहे. "जेव्हा आम्ही एकमेकांना शोधलं, तेव्हा खरंतर आम्ही स्वतःला शोधलं आणि हे सर्वात सुंदर प्रकारचं प्रेम आहे. आता तर लग्नाला एक महिना झाला आहे, पण कायम आयुष्य एकत्र जगण्याची सुरुवात खूप आधीपासूनच सुरू झाली आहे."क्रितीने लग्नाचे फोटो आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केले होते. लग्नासाठी क्रितीने बेबी पिंक रंगाचा लेहेंगा निवडला होता, तर पुलकितने या खास दिवसासाठी ऑलिव्ह ग्रीन रंगाची शेरवानी परिधान केली होती. पुलकितच्या शेरवानीची खासियत म्हणजे यावर संस्कृतमध्ये मंत्र लिहिलेले होते. सुंदर कॅप्शन देत क्रितीने हे लग्नाचे फोटो शेअर केले होते. क्रितीने लग्नाचे फोटो शेअर केल्यानंतर बॉलीवूड कलाविश्वातून शुभेच्छांचा वर्षाव झाला होता.दरम्यान, पुलकित व क्रितीबद्दल सांगायचं झाल्यास मागच्या काही वर्षांपासून ते एकमेकांना डेट करत होते. दोघांनी काही महिन्यांपूर्वी मार्चमध्ये लग्न करणार असल्याचे संकेत फोटो पोस्ट करून दिले होते.

# 15व्या वर्षात विद्या पडली होती प्रेमात

आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशनसमध्ये व्यग्र आहे. रोमँटिक कॉमेडी चित्रपट 'दो और दो प्यार' येत्या शुक्रवारी म्हणजेच १९ एप्रिलला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाद्वारे विद्या बालन पुन्हा एकदा नवी भूमिका घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी विद्या बालन आणि अभिनेता प्रतीक गांधीने इन्स्टंट बॉलीवूडला भेट दिली. नुकत्याच 'इन्स्टंट बॉलीवूड'ला दिलेल्या मुलाखतीत विद्याने आपल्या पहिल्या प्रेमाबद्दल सांगितलं. मुलाखतदाराने पहिल्यांदा प्रेमात पडल्याचा किस्सा विचारला असता विद्या म्हणाली, "मी जेव्हा पहिल्यांदा प्रेमात पडले तेव्हा मी १५ वर्षांची होते. ते फक्त आकर्षण होतं आणि प्रेम नव्हतं. पण तेव्हा मला वाटायचं की, मला माझं प्रेम मिळालं आहे. आता याच्याबरोबरच लग्न, याच्याबरोबरच आयुष्य घालवणार आणि हेच माझं नशीब आहे. नंतर काही दिवसांनी मला त्याची वेगळीच बाजू दिसली आणि मला ते आवडलं नाही, पटलं नाही, मग मी त्याचा विचार सोडून दिला."पहिल्यांदा झालेल्या हार्टब्रेकबद्दलही विद्या बालनने सांगितलं. ती म्हणाली, "मी ज्या मुलाला पहिल्यांदा डेट केलेलं त्याने माझं हार्टब्रेक केलं, कारण त्याने मला फसवलं होतं. आमचं नुकतचं ब्रेकअप झालेलं आणि व्हॅलेन्टाईन्स डेला तो मला कॉलेजमध्ये दिसला. आम्ही एकाच कॉलेजमध्ये होतो. तो मला म्हणाला की, मी माझ्या एक्स गर्लफ्रेंडबरोबर डेटला जातोय. मी यावर त्याला ओके म्हटलं. कारण तेव्हा मला खूप त्रास झाला होता. मी सांगूही शकत नाही इतकं वाईट वाटलेलं मला."चित्रपटातील विद्या बालनचा सहकलाकार प्रतीक गांधीनेही त्याच्या प्रेमाबद्दल सांगितलं. प्रतीक एकदाच प्रेमात पडला आणि दोन वर्षे मागे लागून त्याने त्याची पत्नी भामिनी ओझाशीचं लग्न केलं.दरम्यान, शीर्षा गुहा ठाकुरता दिग्दर्शित 'दो और दो प्यार' चित्रपटाबद्दल सांगायचं झालं तर, या चित्रपटात विद्या बालनसह प्रतीक गांधी, इलिआना डिक्रुझ, सेंधिल राममूर्ती यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. १९ एप्रिलला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांना भुरळ घालणारी अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशन्समध्ये व्यग्र आहे.




# गोलंदाजीतील विलंब पडणार महागात!

## वर्ल्डकपपासून लागू होणार ‘स्टॉप क्लॉक’ नियम

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएलच्या मागील दोन हंगामापासून इम्पॅक्ट प्लेयर नियम लागू करण्यात आला आहे. या नियमानुसार, सामन्याच्या मध्यभागी प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळणाऱ्या खेळाडूंची अदला-बदल शक्य आहे. वास्तविक, बीसीसीआय व्यतिरिक्त, आयसीसी सतत नवीन नियमांवर काम करत आहे, जेणेकरून क्रिकेट चाहत्यांसाठी मजेदार बनवता येईल. हे पाहता अनेक प्रकारचे नियम धाब्यावर बसवण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. मात्र, २ जूनपासून टी-२० विश्वचषक २०२४ चे आयोजन केले जात आहे. या स्पर्धेपूर्वी स्टॉप क्लॉक नियमाबद्दल मोठी माहिती समोर येत आहे.**



टी-२० विश्वचषकात निर्धारित वेळेत षटके पूर्ण न करणाऱ्या संघांना ही चूक महागात पडू शकते. आयसीसीने या विश्वचषकापासून मर्यादीत षटकांच्या स्वरूपातील स्टॉप क्लॉक नियम नियमित केला आहे. प्रयोग म्हणून हा नियम यशस्वी झाल्यानंतर आयसीसीने तो नियमित जाणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, आयसीसी टी-२० वर्ल्ड कपमध्ये स्टॉप क्लॉक नियम लागू करण्यास तयार आहे. पण स्टॉप क्लॉकचा नियम काय आहे हे तुम्हाला माहिती आहे का?वास्तविक, स्टॉप क्लॉक नियम लागू झाल्यानंतर, क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला नवीन षटक सुरू करण्यासाठी ६० सेकंद दिले जातील. उदाहरणार्थ, एखाद्या संघाच्या गोलंदाजाने त्याचे षटक पूर्ण केले तर दुसरे षटक ६० सेकंदात सुरू करावे लागेल. दरम्यान, तिसरे पंच ६० सेकंदांचा टायमर सेट करतील, जेणेकरून क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाचा कोणताही गैरसमज होऊ नये आणि योग्य वेळी ओव्हर सुरू करता येईल.पण जर विरोधी संघ निर्धारित ६० सेकंदात दुसरे षटक सुरू करू शकला नाही तर काय होईल? वास्तविक, असे झाल्यास क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला किंमत मोजावी लागेल. त्या बदल्यात फलंदाजी करणाऱ्या संघाला पेनल्टी म्हणून ५ धावा मिळतील. मात्र, त्याआधी पंच संबंधित संघाला दोन वेळा ताकीद देतील, मात्र तिसऱ्यांदा चूक झाल्यास विरोधी संघाला ५ अतिरिक्त धावा मिळतील. तथापि, स्टॉप क्लॉक नियम लागू झाल्यानंतर टी-२० स्वरूप किती बदलते हे पाहणे मनोरंजक असेल?आयसीसीने डिसेंबर २०२३ पासून मर्यादित षटकाच्या स्वरूपात हा नियम लागू केला होता. या नियमामुळे सामन्यादरम्यान २० मिनिटांपर्यंतचा वेळ वाचला. या यशाने प्रोत्साहित होऊन, आयसीसीने टी-२० विश्वचषकातून मर्यादीत षटकाच्या स्वरूपात नियमित केले. आयसीसीने सामन्यादरम्यान काही परिस्थितींमध्ये हा नियम लागू केलेला नाही. मात्र, ते पूर्णपणे तिसऱ्या पंचावर अवलंबून असेल. नवीन फलंदाज आल्यास घड्याळ सुरू होणार नाही. अधिकृत ड्रिंक ब्रेकदरम्यान सवलत देखील असेल. फलंदाज किंवा क्षेत्ररक्षकाला दुखापत झाल्यास किंवा क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाने वेळ वाया न घालवल्यास टायमर सेट होणार नाही.टी-२० विश्वचषकात निर्धारित वेळेत षटके पूर्ण न करणाऱ्या संघांना ही चूक महागात पडू शकते. आयसीसीने या विश्वचषकापासून मर्यादीत षटकांच्या स्वरूपातील स्टॉप क्लॉक नियम नियमित केला आहे. प्रयोग म्हणून हा नियम यशस्वी झाल्यानंतर आयसीसीने तो नियमित जाणार आहेनियम लागू करण्यास तयार आहे. पण स्टॉप क्लॉकचा नियम काय आहे.

### विरोधी संघाला 50 धावा मिळतील?

वास्तविक, स्टॉप क्लॉक नियम लागू झाल्यानंतर, क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला नवीन षटक सुरू करण्यासाठी ६० सेकंद दिले जातील. उदाहरणार्थ, एखाद्या संघाच्या गोलंदाजाने त्याचे षटक पूर्ण केले तर दुसरे षटक ६० सेकंदात सुरू करावे लागेल. दरम्यान, तिसरे पंच ६० सेकंदांचा टायमर सेट करतील, जेणेकरून क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाचा कोणताही गैरसमज होऊ नये आणि योग्य वेळी ओव्हर सुरू करता येईल.पण जर विरोधी संघ निर्धारित ६० सेकंदात दुसरे षटक सुरू करू शकला नाही तर काय होईल? वास्तविक, असे झाल्यास क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाला किंमत मोजावी लागेल. मात्र, त्याआधी पंच संबंधित संघाला दोन वेळा ताकीद देतील, मात्र तिसऱ्यांदा चूक झाल्यास विरोधी संघाला ५ अतिरिक्त धावा मिळतील.

# हार्दिक पंड्या पाचवा गोलंदाज असू शकत नाही

## भारताचे माजी क्रिकेटपटू संजय मांजरेकर यांनी टीमला दिला इशारा

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० विश्वचषक २०२४ रविवारी (२ जून) पासून सुरू होणार असून टीम इंडियाने अद्याप प्लेइंग इलेव्हनच्या खेळाडूंचा निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे ही त्यांच्यासाठी मोठी डोकेदुखी बनली आहे. ओपनिंग स्लॉटसह काही महत्त्वाच्या क्रमांकाबाबत मोठे निर्णय घ्यावे लागतील. सलामीच्या दावेदारांमध्ये यशस्वी जैस्वाल, कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा समावेश आहे. कोहलीला कुठे खेळवायचे हे कर्णधार आणि प्रशिक्षकाला ठरवावे लागेल.**






सलामीवीर म्हणून किंवा तिसऱ्या क्रमांकावर. कोहलीने आयपीएलमध्ये सलामीवीर म्हणून चमकदार कामगिरी केली आहे. अशात माजी खेळाडू संजय मांजरेकर यांनी हार्दिक पंड्या आणि शिवम दुबेबद्दल मोठे वक्तव्य केले आहे. टीम इंडियासाठी चिंतेचे आणखी एक मोठे क्षेत्र म्हणजे गोलंदाजी संयोजन आहे. भारतीय खेळाडूंनी अमेरिकेच्या भूमीवर फारसे क्रिकेट खेळलेले नाही आणि संघ ग्रुप स्टेजपूर्वी एकच सराव सामना खेळणार आहे. त्यामुळे आपल्या फलंदाजीची खोली वाढवण्यासाठी टीम इंडिया यशस्वी जैस्वाल आणि शिवम दुबे यांचा सुरुवातीच्या फळीत समावेश करू शकतो. हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे हे पाचवे गोलंदाज म्हणून पाहिले जाऊ शकतात.भारताचे माजी क्रिकेटपटू संजय मांजरेकर यांनी सांगितले की, हार्दिकची आंतरराष्ट्रीय कामगिरी पाहता, मी शिवम दुबेऐवजी पंड्याला प्राधान्य देईल. २०१६ मध्ये भारतीय संघात सामील झाल्यापासून पंड्याने सर्व फॉरमॅटमध्ये अष्टपैलू कामगिरी केली आहे. तथापि, २०१८ आशिया चषक स्पर्धेत पाठीच्या दुखापतीमुळे आणि २०१९ विश्वचषकातील शस्त्रक्रियेमुळे, तो त्याच्या सर्वोत्तम कामगिरीकडे परत येऊ शकला नाही.

### सहावा गोलंदाज म्हणून हार्दिक

तसेच २०२१ च्या टी-२० विश्वचषकात फक्त एक फलंदाज म्हणून खेळला जिथे भारत उपांत्य फेरीतही पोहोचू शकला नाही.संजय मांजरेकर म्हणाले, “माझे मत नेहमीच हार्दिक पंड्याला असेल. मला माहित आहे की यावेळी आयपीएलचा हंगाम त्याच्यासाठी खास गेला नाही, परंतु भारताच्या शेवटच्या टी-२० विश्वचषक सामन्यात इंग्लंड विरुद्ध ॲडलेडमध्ये हार्दिकने १९० च्या स्ट्राइक रेटने सुमारे ३० चेंडूंमध्ये ६० धावा केल्या होत्या, जेव्हा भारताने पहिल्या १० षटकांत ६२ धावा केल्या होत्या. त्यामुळे जेव्हा टी-२० विश्वचषक आणि मोठ्या स्पर्धांचा विचार केला जातो, तेव्हा तुम्ही मोठ्या टप्प्यावर चमकलेल्या खेळाडूंना पाठिंबा देता. माजी खेळाडू पुढे म्हणाले, “हार्दिक पंड्या तुमचा पाचवा गोलंदाज होऊ शकत नाही. मला वाटतं भारताकडे सहावा गोलंदाज म्हणून हार्दिक पंड्या असायला हवा. कारण त्याने खूप आणि सर्व फिटनेस समस्यांसह गोलंदाजी केली आहे. त्यामुळे मी फिरकीवर थोडे अधिक लक्ष केंद्रित करू इच्छितो.